स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत "मराठी" विषयातील पीएच.डी (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

"भुजंग मेश्राम यांचे समग्र वाङ्मय: एक चिकित्सक अभ्यास"

संशोधक

आबासाहेब हौसाजी खुडे

रा. घोळवा ता. कळमनुरी जि. हिंगोली

पिन - 431702

मार्गदर्शक

डॉ. विलास शेषराव पाटील

प्रोफेसर, संशोधक मार्गदर्शक आणि मराठी विभागप्रमुख,
ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि. परभणी
पिन - 431509

संशोधन केंद्र

भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड - 431606.

मार्च 2022

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्र.
1.	प्रास्ताविका	3-5
2.	संशोधनाची गरज	5
3.	संशोधनाची व्याप्ती	6
4.	अभ्यास मर्यादा	6
5.	संशोधनाची गृहितके	6
6.	संशोधनाचे महत्त्व	7
7.	संशोधनाची साधने	8
8.	संशोधन पद्धती	9
9.	संशोधनाचा उद्देश / हेतू	9
10.	संभाव्य निष्कर्ष	9
11.	प्रकरण रचना	10-11
12.	संदर्भग्रंथ सूची	12
13.	परिशिष्टे	13

"भुजंग मेश्राम यांचे समग्र वाङ्मय: एक चिकित्सक अभ्यास"

प्रास्ताविका :-

मराठी साहित्यामध्ये कविता, नाटक, एकांकिका, कथा, कांदबरी, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, समीक्षा इत्यादी वाङ्मय प्रकाराचा समावेश होतो. यातील कविता हा वाङ्मय प्रकार प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा महत्त्वाचा असा वाङ्मय प्रकार आहे. आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासात कविता या वाङ्मय प्रकाराला फार मोठी पंरपरा लाभली आहे. संतकाव्य, पंतकाव्य, तंतकाव्य, शाहिरी काव्य ही मोठी पंरपरा प्रयोगशील व दर्जेदार लेखनामुळे अधिक समृद्ध व विकसित झाली आहे.

मराठी ग्रामीण काव्याची सुरुवात खऱ्या अर्थाने भारतीय स्वातंत्र्यानंतर झाली आहे. ती म्हणजे सन 1950-1960 पासून झाली आहे, आणि 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली; व खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्याला सुरूवात झाली. त्याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे शिक्षणाची संधी मागासवर्गीय, दलित, आदिवासी, भटके-विमुक्त जातींना शिक्षण मिळाले; आणि त्यातूनच आदिवासी साहित्य उदयाचे कारण निर्माण झाले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आदिवासी समाजाचे आदिवासी कवी उदयास आले ते म्हणजे डॉ. विनायक तुमराम, डॉ. गोंवदि गारे, वाहरू सोनवणे, प्रा. माधव सरकुंडे, व्यंकटेश आत्राम, सुखदेवबाबू उईके, उषा किरण आत्राम, भुजंग मेश्राम या कवींनी आदिवासी साहित्य लेखनाला सुरुवात केली. त्यापैकी आदिवासी दुर्गम डोंगराळ भागात गरीब कुंटुबात कवी भुजंग मेश्राम यांचा उदय झाला आणि त्यांनी आदिवासी गोंडी समाजात लेखनास सुरुवात केली. विद्यार्थी दशेत असतानाच कविता लेखनाची गोडी लागली. अशा कवीचा जन्म 9 ऑक्टोबर 1958 रोजी झाला. किनवटच्या (जि. नांदेड)

अरण्यक्षेत्रातील तुळशी मलकागुडा हे छोटेसेच खेडे गाव; येथे भुजंग धर्माजी मेश्राम यांचा जन्म झाला. या छोट्या गावात त्यांचे बालपण गेले आणि प्राथमिक शिक्षण झाले. किनवटच्या आश्रम शाळेत माध्यमिक शिक्षण झाले. पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी नांदेडला यशवंत महाविद्यालय येथे प्रवेश घेतला. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना त्यांनी **'आदिवासी कविता'** हा गोंडी भाषेत कविता संग्रह लिहिला आणि सन 1976 ला प्रकाशित झाला. पुढे मुंबईचे, सिद्धार्थ महाविद्यालय येथे त्यांचे नंतरचे शिक्षण झाले. बी.ए. आणि दोन पदविका मिळवून ते महाराष्ट्र शासनाच्या सेवेत राजपत्रित अधिकारी झाले. मागील काही काळात ते हिरन बसव कल्याननगर, शिवमंदिर रोड, अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे येथील रहिवासी होते, ते सहकारी व वस्त्रोद्योग विभागात नोकरी करीत असताना साहाय्यक निबंधक ते सहकारी संस्था या पदापर्यंत कार्य करत राहिले. पुढे त्यांनी प्रभू राजगडकर यांच्या मदतीने **'मोहोळ'** हा कवितासंग्रह 1982 साली प्रकाशित केला आणि पुढे काही वर्षानंतर त्यांचा **'ऊलगुलान'** हा कवितासंग्रह इ.स.1990 साली प्रकाशित केला. त्यामुळे कवी भुजंग मेश्राम जास्त परिचित झाले. त्यांनी कवितांचे लेखन गोंडी, गोरमाटी, परधानी, वारली, वऱ्हाडी या भाषेतून केले; त्यांचे प्रभू राजगडकर यांनी मराठीत अनुवाद केले. त्यामुळे हा ग्रंथ अनुवादीत ग्रंथ म्हणून ओळखला जातो. **'ऊलगुलान'** या काव्यसंग्रहातून भाषा फुलविणारा कवी म्हणून मेश्रामाचे नाव आग्रक्रमाणे घेतले जाते. कवी मेश्राम यांची कविता स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांचा स्वीकार करते म्हणून आदिवासी समाज त्यांना पविवर्तनवादी कवी म्हणून ओळखतो; किंवा मराठी साहित्यात विद्रोही कवी म्हणून त्यांचे स्थान निश्चित होते.

नंतर त्यांचे काही काळांनी अकाली निधन झाले. 27 ऑगस्ट 2007 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यू पश्चात 'अभुज-माड' हा कवितासंग्रह इ.स. 2008 मध्ये प्रकाशित झाला. 'अभुज-माड' हा छत्तीसगडमधील बस्तरमधील भाग आहे. आदिवासी क्षेत्रातला अतिशय दुर्गम असा डोंगराळ भाग आहे. नारायणपूर तहसिल मधील सुमारे 1500 ते 4000 चौरस मैलाच्या या घनदाट अरण्याला हिंदी भाषिक 'अबूझमाड' किवा 'अबुजमाड' म्हणतात. या भागात गोंड आदिवासींच्या तीन महत्त्वाच्या उप-जनजातींपैकी एक, आणि सगळ्यात आदिम अशी अभुज-माडीया आदिवासीची विरळ वस्ती आहे. स्वत:ला निसर्गाचा एक अंश मानणारे, फिरत्या शेतीवर व शिकारीवर उदरनिर्वाह करणारे, धरतीमातेला जखमा होतील म्हणून नांगर न चालवणारे, बाहेरच्या जगाशी संबंध न ठेवणारे आदिम अभुज-माडीया गोंड आणि त्यांच्या जन्मभराच्या आस्थेचा विषय होता; आणि त्यात ते आपली मुळे शोधत होते, म्हणून भुजंग मेश्राम यांच्या संमग्र वाङ्मयाचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

संशोधनाची गरज :-

प्रस्तावनेत विषद केल्याप्रमाणे **"भुजंग मेश्राम यांचे समग्र वाङ्मय: एक चिकित्सक अभ्यास"** या विषया आधारे, आदिवासी समाजावर प्रस्थापित समाज व्यवस्थेने केलेला अन्याय अत्याचार आणि त्यांची लूट यामधून होताना दिसून येते. म्हणून आदिवासी कवी भुजंग मेश्राम यांना महाराष्ट्रातील एक विद्रोही कवी म्हणून ओळखले जाते म्हणून त्यांच्या साहित्याचा शोध घेणे गरजेचे वाटते.

संशोधनाची व्याप्ती :-

या प्रंबधाची व्याप्ती कवी भुजंग मेश्राम यांचे समग्र वाङ्मय या साहित्यातून आदिवासींचा विद्रोह विशद करणे व महाराष्ट्रातील संपूर्ण आदिवासी समाजाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे ही संशोधनाची व्याप्ती आहे.

अभ्यास मर्यादा :-

कवी भुजंग मेश्राम यांच्या 'मोहोळ', 'ऊलगुलान', 'औतान', 'अभुज-माड' या साहित्याच्या आधारे अभ्यास या संशोधनात अंतर्भूत आहे. त्यांनी लिहिलेले साहित्य या संशोधनासाठी लिखित सामग्री अपेक्षित असेल.

संशोधनाची गृहितके :-

1) कवी भुजंग मेश्राम यांच्या समग्र वाङ्मयासाठी पाठीमागील पार्श्वभूमी उजागर करणे.

2) कवी भुजंग मेश्राम यांच्या काव्यातून व्यक्त झालेल्या आदिवासी समाजावरील अन्यायाचा शोध घेणे.

3) महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या समस्यांचा, संस्कृतीचा शोध घेणे.

4) कवी भुजंग मेश्राम यांच्या लेखनातील वेगळेपण लक्षात घेऊन उधवस्त झालेले जगणे, ताणतणाव, मनोव्यापार यामुळे समाज जीवनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

5) कवितेतील कवी भुजंग मेश्राम यांच्या स्वाभिमानी माणसाच्या निडर व खंबीर जीवनाचा अभ्यास करणे.

6) पोटाची भूक भागविण्यासाठी धडपडणाऱ्या आदिवासी समाजाच्या व्यथांचा अभ्यास करणे व त्यांचा शोध घेणे.

7) काही आदिवासी स्त्री जीवनाचा शोध घेणे.

8) आदिवासीच्या सांस्कृतिक, सामाजिक पुनर्शोधाचे मूळ शोधणे.

9) कवितेतून आलेल्या आदिवासींचे जगणे, वागणे व राहाणीमान, जीवनमान, आचार-विचार दृष्टिकोन, भावभावना, जीवन विषयक दृष्टिकोन यांचा शोध घेणे.

संशोधनाचे महत्त्व :-

आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणाच्या काळात महाराष्ट्रातील आदिवासींच्या समाजजीवनाच्या स्थितीत झालेला बदल अभ्यासणे गरजेचे आहे. मानवी जीवनात नेहमी आदिवासी माणूस आणि समुह करून राहत असलेल्या समाजावर; प्रस्थापित समाज व्यवस्थेकडून कशा पद्धतीने अन्याय झाला. तो प्रस्थापित काळात सहन केला आणि काळानुरूप त्यामध्ये झालेला बदल आणि त्यावर होणारा बरावाईट परिणाम, आदिवासी समाजजीवनाच्या बदलास कारणीभूत ठरत आहे.

आदिवासी समाजाची आजवरची उलट-सुलट मांडणी लक्षात घेता एक सुस्पष्ट अशी व्याख्या सामाजिक तत्त्वांचा-मुल्यांचा विचार केंद्रस्थानी ठेवून करता येईल. सामाजिक वाद ही अशी व्यवस्था आहे की जीच्यातून भूमितत्त्व, भौगोलिकता, जातिव्यवस्था, वंश, भाषा,

धर्म, आध्यात्मिकता, दैवत कल्पना, ईश्वराची आराधना, प्रार्थना, नियती, प्रारब्ध, प्रथा, परंपरा, ऐतिहासिकता, गतीशिलता, आधुनिकता, आक्रमकता इत्यादी मूल्यांना प्रेरित आणि प्रभावित करून सामाजिक आणि कला माध्यमातून मूल्यनिष्ठा आणि मूल्यनिर्मिती करणारी आदिवासी समुहाला आस्मिता, अस्तित्व व आत्मसन्मान देणारी; वैचारिक प्रणाली होय. या दृष्टीने संशोधन महत्त्वाचे आहे.

संशोधनाची साधने :-

1. प्रस्तुत संशोधनासाठी कवी भुजंग मेश्राम यांचे मुळ कवितासंग्रह 'मोहोळ', 'ऊलगुलान', 'अभुज-माड' या कविता संग्रहांचा आधारभूत साधन म्हणून वापर करण्यात येणार आहे.
2. भुजंग मेश्राम यांच्या टीकाकारांच्या टीकेचा अभ्यास करुन मिळालेली माहिती वस्तूनिष्ठपणे मांडणी करण्यात येईल.
3. ग्रंथालयात, संदर्भग्रथ व इतर ग्रंथाचा वापर करण्यात येईल.
4. नियतकालिके, प्रसिद्ध लेख, वर्तमान पत्रातील लेख व अंक यांचा वापर करण्यात येईल.
5. भुजंग मेश्राम यांच्यावरील टीकाग्रंथ, संशोधन, मनोगत आणि अनेक संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला जाईल.

संशोधन पध्दती :-

कवी भुजंग मेश्राम यांच्या समंग्र वाङ्मयाचा अभ्यास करीत असताना, अभ्यासातील प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा योग्यरित्या वापर करण्यात येईल. तसेच विश्लेषण, ऐतिहासिक संशोधन पद्धती, प्रसंगी इंटरनेटवरील साहित्य या बाबींचा अवलंब करण्यात येईल. तसेच व्याप्ती व संशोधन पद्धती (Case Study) चा अवलंब करण्यात येईल.

संशोधनाचा उद्देश / हेतू :-

1. मराठी कवितेची प्रेरणा आणि विकासात भुजंग मेश्राम यांचा सहभाग उलगडून दाखविणे.
2. एक समर्थ कवी, समीक्षक, अनुवादक म्हणून भुजंग मेश्राम यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणे.
3. कवींच्या इतिहासात समग्र वाङ्मयाचे स्थान निश्चित करणे आणि या समग्र वाङ्मयाचा सर्वांगीन अभ्यास करणे हा संशोधनाचा हेतू आहे.

संभाव्य निष्कर्ष :-

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे मराठी आदिवासी समग्र वाङ्मयाचे स्वरूप व वैशिष्ट्ये साधार पाहवयास मिळतात. मेश्राम यांच्या साहित्याला प्रेरणा देणाऱ्या बाबींचे स्वरूप पहायला मिळते. बदलत्या आदिवासी समाज व्यवस्थेचा आशय आसणाऱ्या समग्र वाङ्मयाचे अंगभूत

वैशिष्ट्ये नोंदवता येतील. तसेच आदिवासी समाज जीवनाशी निगडीत वैचारिकतेची भूमिका अभ्यासता येईल.

प्रकरण रचना :-

प्रकरण पहिले - **उपोद्‌घात**

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाची प्रस्तावना, संशोधनाचे महत्त्व, अभ्यास विषयाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा या सर्व बाबींचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे - **1975 ते 1990 मराठी कविता, एकांकिका आणि समीक्षा-अनुवाद**

या प्रकरणात सन 1975 ते 1990 या काळातील ग्रामीण, दलित, आदिवासी अंगाणे कसी विकसित होत गेली; या बाबी नोंदवण्यात येतील.

प्रकरण तिसरे - **भुजंग मेश्राम यांची वाङ्‌मयीन जडण-घडण**

प्रस्तुत प्रकरणात भुजंग मेश्राम यांचे जीवन, काळ आणि वाङ्‌मय जडण-घडण या प्रवासाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे - **भुजंग मेश्राम यांची कविता**

भुजंग मेश्राम यांच्या ऊलगुलान, मोहोळ व अभुजमाड या कविता संग्रहातील कवितांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे -   भुजंग मेश्राम यांच्या एकांकिका आणि इतर अनुवाद

भुजंग मेश्राम यांच्या 'औतान' या एकांकिकेचा अभ्यास करून गोंडी, वारली, गोरमाटी या भाषेतील त्यांनी केलेल्या कवितांचा अनुवाद या विषयीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे -   भुजंग मेश्राम यांची समीक्षा

कवी भुजंग मेश्राम यांनी दलित व आदिवासी साहित्या संदर्भात लेख लिहिले आहेत. कविता संग्रहांची समीक्षा कोणत्या अंगाने केली ? याचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे.

प्रकरण सातवे -   भुजंग मेश्राम यांची भाषा, शैली आणि बोली

प्रस्तुत प्रकरणामध्ये कवितेची भाषा आणि लेखनाची शैली व बोली भाषा यांचा सर्वांगीण अभ्यास केला जाईल.

प्रकरण आठवे -   उपसंहार

कविता, एकांकिका, समीक्षक म्हणून कवी भुजंग मेश्राम यांची महाराष्ट्रभर तसेच भारतभर ओळख होते. कवी म्हणून त्यांचा कसा विकास होत गेला, नंतर साहित्यिक म्हणून भारतभर झालेली ओळख आणि मराठी ग्रामीण आदिवासी कवी म्हणून नावलौकीक; या सर्व बाबींचा आढावा या प्रकरणात संशोधक म्हणून घेणार आहे. तसेच भुजंग मेश्राम यांच्या वाङ्मयाच्या अभ्यासातून मला जाणवलेले निष्कर्ष नोंदविले जातील.

अ) संदर्भग्रंथसूची

1) मेश्राम भुजंग - ऊलगुलान, साकेत प्रकाशन, औरंगाबाद -1995.

2) मेश्राम भुजंग - औतान, जाई प्रकाशन, जि. ठाणे, मे- 2007.

3) मेश्राम भुजंग - अभुजमाड, लोकवाङ्मय प्रकाशन, 2008.

4) मेश्राम भुजंग - आदिवासी साहित्य आणि आस्मितावेध, गुप्ता भवन, एप्रिल- 2018.

5) डॉ. गावीत माहेश्वरी - महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध - दास्ताने रामचंद्र आणि कं. सदाशिव पेठ, पुणे - 2008.

6) प्रा.डॉ. फड शत्रुघ्न - आदिवासी साहित्य आणि लोककला, वसई रोड (पश्चिम) ठाणे - 2012.

7) प्रा.डॉ. धनजकर राजेश - मराठवाड्यातील आंध जमातीचे लोक साहित्य - अनुराधा पब्लिकेशन सिडको - नांदेड

8) प्रा. सरकुंडे माधव - आदिवासी अस्मितेचा शोध - देवयानी प्रकाशन.

9) कोत्तापल्ले नागनाथ - साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 2008.

10) केजकर देशपांडे प्रकाश - समकालीन मराठी कविता: एक निरिक्षण, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

परिशिष्टे :-

कवी भुजंग मेश्राम यांचे प्रकाशित साहित्य, पुरस्कार व इतर.

कवी भुजंग मेश्राम यांचे एकूण समग्र वाङ्मय लक्षात घेता ते मराठी कवितेतील एक प्रमुख टप्पा आहेत हे लक्षात येते. कवी म्हणून भुजंग मेश्राम यांची झालेली जडण-घडण, त्यांचे जगणे आणि कविता या संबंधी विचार, भूमिका आणि मत मतांतरे यातून त्यांचे समीक्षेच्या अंगाने व्यक्तिमत्त्व शब्दांकित करणे आणि त्यांच्या कवितेचे वेगळेपण सर्वांगीण अंगाने विशद करणे हा प्रस्तुत प्रबंधकाराचा मानस आहे.

मार्गदर्शक

डॉ. विलास शेषराव पाटील
प्रोफेसर संशोधक मार्गदर्शक आणि
मराठी विभाग प्रमुख,
ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि.परभणी
पिन - 431509

संशोधक

आबासाहेब हौसाजी खुडे
रा. घोळवा ता. कळमनुरी जि. हिंगोली
पिन - 431702